## श्री पध्दतीचे फायदे

१) **उत्पादनात वाढः** ६० ते ८० टक्के उत्पादनात वाढ होते. तसेच ५० ते ७५ टक्के जास्त प्रमाणात भाताची काडे मिळतात.

२) **पाण्याची बचतः** २५ ते ५० टक्के कमी पाणी लागते त्यामुळे पाण्याची बचत होते.

३) **बियाणाची बचतः** हेक्टरी फक्त ८ किलो बियाणे लागते. परंपरागत पध्दतीत ८० किलो बियाणे लागते.

४) **रासायनिक खतांचा कमी वापरः** हिरवळीची खते, कंपोस्ट खते यामुळे रासायनिक खतांच्या वापराचे प्रमाण कमी होते.

५) **कीटकनाशकांचा कमी वापरः** कीड आणि रोगांचे प्रमाण कमी झाल्याने कीटकनाशकांचा कमी वापर होतो.

६) **धान्याची गुणवत्ता वाढते.**

८) **धान्य लवकर तयार होतेः** ७ ते १० दिवस आधीच धान्य कापणीवर येते.

९) **भाताच्या कोणत्याही जातीसाठी ही पद्धत वापरता येते.**

१०) **पिकाची वाढ निरोगी आणि दमदार होते.**

## श्री पद्धतीचे यश

**अगदी कमी कालावधीतच शेतकऱ्यांमध्ये ही पद्धत लोकप्रिय झाली आहे. गेल्या वर्षभरात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १५१६ शेतकऱ्यांनी या पद्धतीचा अवलंब केला आहे. एकूण २७७ गावांतील ३४०.८० हेक्टर क्षेत्र 'श्री' पद्धतीच्या लागवडीखाली आहे. आपणही यामध्ये सहभागी होऊ शकता.**









*श्री पद्धत राबवूया । भाताचे उत्पादन वाढवूया ।।*

● संपर्क ●


**दिलासा जनविकास प्रतिष्ठान**

डॉ. अनघा पाटील - ९८२२०९७२६४, ईमेल : presidentdilasa@gmail.com

शशिकांत कासले - ९४२१०२२४९३, हनुमंत गवस - ९४२११४८९०३, सोनू अनावकर - ७५८८८९९०२०,
पायल चालके - ८७९३४२४९३२, भाग्यश्री गव्हाणे - ९८५०५७९५६४


RBL BANK apno ka bank

# भात उत्पादनवाढीची श्री पद्धत

## दिलासा जनविकास प्रतिष्ठान

DILASA

**दिलासा जनविकास प्रतिष्ठान ही संस्था २४ वर्षांपासून ग्रामीण विकासासाठी कार्य करीत आहे. संस्था पाणलोट क्षेत्र विकास, पाणीपुरवठा योजना, भूजल संवर्धन, महिला बचत गटांचे संघटन व सक्षमीकरण, शेतकरी गटांची स्थापना आणि शेतकऱ्यांच्या कंपन्यांची निर्मिती, गुणवत्तापूर्ण कापूस संवर्धन, पर्यावरण संरक्षण तसेच मूल्यमापन आणि संनियंत्रण, असे विविध कार्यक्रम राबवीत आहे. ग्रामीण विकासातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल संस्थेला अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात आरबीएलच्या सहकार्याने भात उत्पादन वाढीचा 'श्री' प्रकल्प दिलासा संस्था राबवीत आहे.**

भात उत्पादनाच्याबाबत भारत हा दुसऱ्या क्रमांकाचा मोठा देश आहे. तथापि, भारताची वाढती लोकसंख्या आणि पौष्टिक अन्नाचा तुटवडा भरून काढण्यासाठी भाताचे उत्पादन आणखी वाढण्याची आवश्यकता आहे. गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात होणारे हवामान बदल, पाण्याचे दुर्भिक्ष्य, खते, बियाणे आणि कीटकनाशके यांच्या वाढत्या किमती, नापिकी, दुष्काळ यामुळे एकरी भाताचे उत्पादन कमी होत आहे. या पार्श्वभूमीवर भातउत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ करणारी **'श्री'** पध्दत शेतकऱ्यांसाठी वरदान आहे.

### श्री पद्धतीची वैशिष्ट्ये

भात उत्पादन वाढीसाठी **'श्री'** ही एक नाविन्यपूर्ण पध्दत आहे. 'श्री' पद्धतीचा शोध आफ्रिकेतील मॅडॅगॅसकर येथील माती तज्ज्ञ हेन्री डे लाऊलानी यांनी १९८० मध्ये लावला. **श्री पद्धत म्हणजे भाताची रोपे, माती, पाणी, पोषकद्रव्ये यांचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन होय.** यात बियाणे, खते, कीटकनाशके यांचा कमीत-कमी वापर करून उत्पादन वाढविले जाते. हे करत असताना पर्यावरणाला धक्का पोहोचत नाही. तसेच भाताच्या कोणत्याही जातीसाठी ही पद्धत आपण वापरू शकतो.

सध्या ५० पेक्षा जास्त देशात श्री पध्दतीचा प्रसार झाला असून लक्षावधी शेतकऱ्यांनी या पध्दतीचा फायदा घेतला आहे. भारतातही तामिळनाडू, बिहार, कर्नाटक, आंध्रप्रदेश, त्रिपुरा इत्यादी राज्यात 'श्री' पद्धतीने शेतकरी लागवड करीत आहेत. या पध्दतीमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन तर वाढतेच शिवाय रासायनिक खतांची २५ टक्के, पाण्याची ४० टक्के बचत होऊन भाताच्या काडाचे उत्पादन ५०-७० टक्क्यांनी वाढते. श्री पध्दतीमुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या अनेक छोट्या आणि मध्यम शेतकऱ्यांना भात उत्पादनवाढीसाठी उत्तम पर्याय मिळाला आहे.

**श्री पद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -**

१) **कमी दिवसांच्या रोपांची लागवड -** दोन ते तीन पाने असलेली आठ ते बारा दिवसांची रोपे लागवडीसाठी वापरली जातात.

२) **रोपांमधील जास्त अंतर -** २५ x २५ से.मी. आकाराच्या चौकोनात रोपांची लागवड केली जाते.

३) **रसायनांचा कमीत-कमी वापर -** खते, कीटकनाशके, फवारणीची औषधे याऐवजी सेंद्रीय खतांचा वापर. उदा. गांडुळखत, शेणखत इ.

४) **पाण्याचा कमीत-कमी वापर.**

५) **कोनोव्हीडरचा वापर -** हवा खेळती राहण्यासाठी आणि तण काढण्यासाठी कोनोव्हीडर (हातकोळपे) वापर.

*घेऊया श्री पद्धतीचा वसा । मिळेल उत्पादनवाढीचा दिलासा ।।*

# "श्री" पद्धतीने भात लागवड कशी करावी?

**१**



शेणखत आणि मातीचे थर देऊन गादी वाफा तयार करावा आणि रोपांसाठी बी पेरून नर्सरी उभारावी

**२**

रोपांची लागवड रोपाला २ किंवा ३ पाने आल्यावर ९ ते १५ दिवसांनी करावी.



**३**



लागवडीच्या वेळी रोपांच्या मुळांना धक्का न पोहचवता मातीसकट शेतात न्यावी

**४**

मार्करच्या वापर करून दोन रोपांमध्ये व दोन ओळींमध्ये २५-२५ सेंमी अंतर ठेवावे



**५**



एका जागी एकच रोप लावावे

**६**

कोनोविडरच्या साहाय्याने दर १० दिवसांनी चार वेळा कोळपणी करावी.



**७**



पिकास आवश्यकतेनुसार पाणी द्यावे व ते सुकल्यानंतर पुन्हा पाणी द्यावे. शेत भिजविणे आणि सुकवणे ही पद्धत वापरावी

**८**

सेंद्रिय खतांचा वापर करावा. उदा.शेणखत, गांडूळ खत, कम्पोस्ट खत, हिरवळीचे खत.



*श्री पद्धतीने भात लावू । गुंठ्यागणिक उत्पादन वाढवू।।*

*श्री पद्धतीने भात लावू । उत्पादनखर्चात बचत करू।।*